अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या
स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व
त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसटीएस-२०१५/प्र.क्र.३७०/अजाक-१

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १ जानेवारी, २०१६

वाचा

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. एसटीएस-२०११/प्र.क्र.४३९/अजाक-१, दि.६ डिसेंबर, २०१२
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. एसटीएस-२०११/प्र.क्र.४३९/अजाक-१, दि.६ फेब्रूवारी, २०१३
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. एसटीएस-२०११/प्र.क्र.४३९/अजाक-१, दि.२ डिसेंबर, २०१३

प्रस्तावना

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याच्या योजनेस शासनाने दि. ६.१२.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर योजना राज्यात सुरू आहे. लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत द्यावयाच्या लाभासाठी अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार दरवर्षी शासनाकडून बचत गटंना मिनी ट्रॅक्टर पुरविण्यासाठी उद्दिष्ट्ये निश्चित करून देण्यात येतात व त्या उद्दिष्टांप्रमाणे संबंधीत जिल्ह्याचे सहाय्य आयुक्त्, समाज कल्याण यांच्यामार्फत बचत गटांची निवड करून मिनी ट्रॅक्टरचे वाटप शासनाने वेळोवळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीप्रमाणे करण्यात येते. सदर मिनी ट्रॅक्टरच्या उद्दिष्टांचे पुनर्वाटप करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय

शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर पुरवठा करावयाचे उद्दिष्ट निश्चित करून दिल्यानंतर काही जिल्ह्यांमध्ये उद्दिष्टांच्या प्रमाणात लाभार्थी स्वयंसहाय्यता बचत गट उपलब्ध होतीलच ही बाब निश्चित नाही.त्यामुळे संबंधीत जिल्ह्याला ठरवून दिलेल्या उद्दिष्टांइतके मिनी ट्रॅक्टरचे वाटप होत नाही. अशा जिल्ह्यातील मिनी ट्रॅक्टरचे शिल्लक उद्दिष्ट इतर जिल्ह्याला मागणी असल्यास वळते करून पात्र गटांना त्यांचे वितरण करणे शक्य आहे. त्यामुळे संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडील शिल्लक असलेल्या मिनी ट्रॅक्टरबाबतची माहिती आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी उपलब्ध करून घेऊन आवश्यकतेनुसार मागणी असलेल्या जिल्ह्यांना मिनी ट्रॅक्टर पुरवठ्याबाबतचे भौतिक उद्दिष्टांचे पुनर्वाटप त्यांच्या स्तरावर

करण्यात यावे. या योजने अंतर्गत मिनी ट्रॅक्टर वाटपाबाबत शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०११५०३५८२९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uttam Shivram Lonare

Digitally signed by Uttam Shivram Lonare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uttam Shivram Lonare
Date: 2016.01.01 15:05:31 +05'30'

उ.शि.लोणारे
सह सचिव

प्रत,

१. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सह आयुक्त, समाज कल्याण (अनुसूचित जाती उपयोजना), पुणे
३. उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. उप सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई
८. सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गट-अ
९. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१०.मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११.मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१३.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/पुणे
१४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५.लेखा व कोषागरे संचालनालय, संगणक शाखा, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
१६.निवड नस्ती, अजाक-१